आकर्षक लग्न पत्रिका

उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण

— श्रीहरि पेपर प्रॉडक्टस् —

"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे

मो.94239 28900



# आपला महाराष्ट्र

₹२.०० | संस्थापक - लोकमित्र भाई मदाने | www.aplamaharashtra.in

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१६४ ■ सोमवार १८ मार्च २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd. No./DHL/53-24-26



ना नफा! ना तोटा!

पशुखाद्य



गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग

200/- रुपये मात्र

हळद २८० रू. किलो, खोबरे १४० रू. किलो

सागर ड्रायफ्रुट

पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)


## काँग्रेसची गॅरंटी हिंदुस्थानचा आवाज, जनतेची मते विचारात घेऊन बनवली- खा.राहुल गांधी

**मुंबई, दि.१७– कन्याकुमारी ते काश्मीर हजार किलोमीटरची पदयात्रा केल्यामुळे हिंदुस्थान जवळून पाहण्याची संधी मिळाली. मी जो हिंदुस्थान समजत होता त्यापेक्षा तो वेगळा असल्याचे या यात्रेतून समजले. भारत जोडो यात्रेतून लोकांशी संवाद साधल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे दिसले त्यामुळे दुसऱ्या यात्रेत न्याय हा शब्द जोडला. या यात्रेतून पाच घटकांना गॅरंटी देण्यात आल्या. ही गॅरंटी काँग्रेस पक्ष, मल्लिकार्जून खरगे वा राहुल गांधीची नाही तर तो हिंदुस्थानचा आवाज आहे, जनतेची मते विचारात घेऊन गॅरंटी दिलेली आहे, असे खासदार राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.**

मुंबईत आयोजित न्याय संकल्प सभेत खासदार राहुल गांधी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने जनतेला विचारून, सर्वांची मते विचारात घेऊन या गॅरंटी दिल्या आहेत. भारतीय जनता पक्ष हे करु शकत नाही कारण त्यांच्याकडे सर्वकाही वरून येते. भाजपात केंद्रीकृत पद्धत आहे. सर्व काही नरेंद्र मोदी सांगतात तसेच चालते. आरएसएस व त्यांच्यामते ज्ञान एकाच व्यक्तीजवळ आहे, कामगार, शेतकरी यांना काहीच समजत नाही. बेरोजगाराला काही माहितीच नाही, असे ते समजतात. देशातील सर्वात विद्वान शास्त्रज्ञानाजवळ जेवढे ज्ञान आहे तेवढेच ज्ञान शेतकऱ्याजवळ आहे. बीडी कामगार महिलांच्या हातात जे कौशल्य आहे त्याचा आदर केला जात नाही, त्यांना पाठिंबा देणे गरजेचे आहे, आर्थिक मदत करा, मग बघा किती फरक पडतो, त्यांच्या हातातून मेक इन इंडिया घडतो. हिंदुस्थान द्वेषाचा देश नाही तर प्रेमाचा देश आहे. भारतीयांच्या डीएनएमध्येच आदर, प्रेम भरपूर आहे. हिंदुस्थान हा जगातील पहिला देश आहे ज्याने स्वातंत्र्याची लढाई प्रेमाने लढली. दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्याची प्रेरणा भारताकडून मिळाली, गांधीजींचे तत्वज्ञान व दिशा मिळाली त्यातूनच दक्षिण आफ्रिकेला (पान ४ वर)

### भारत जोडो न्याय यात्रेची मुंबईत सांगता

## पंतप्रधान मोदी ईव्हीएमशिवाय जिंकू शकत नाही शिवाजी पार्कातून खा. राहुल गांधी यांची टीका



**मुंबई, दि.१७– आम्ही सर्व मोदींविरोधात लढत आहोत, असं म्हटलं जातंय. पण आम्ही एकाही व्यक्तीच्या विरोधात लढत नाहीत. आम्ही भाजपा किंवा कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात नाहीत. परंतु, एका व्यक्तीचा चेहरा तयार करून ठेवला आहे. हिंदू धर्मात शक्ती शब्द आहे. आम्ही या शक्तीविरोधात लढत आहोत. इव्हीएमशिवाय मोदी निवडणूक जिंकू शकत नाही. निवडणूक आयोगाला आम्ही सांगितलं की** (पान ४ वर)

## वृध्द सा. कलाकारांना पाच हजार मानधन

मुंबई, दि.१७– राज्यातील वृद्ध साहित्यिक व कलाकारांच्या मानधनात सुधारणा करून राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजनेंतर्गत सर्वांना पाच हजार रुपये मासिक मानधन देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यापूर्वी हे मानधन वर्गवारीनुसार दिले जात होते. या वाढीव मानधनासाठी १२५ कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली. पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ कला व साहित्य सेवा करणाऱ्या कलावंतांना श्रेणीनिहाय मानधन न देता सर्वांना पाच हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी मागणी होती. या योजनेतील कलाकार व साहित्यिकांना सध्या अ वर्गातील कलावंतांना तीन हजार एकशे पन्नास रुपये, ब वर्ग कलावंतांस दोन हजार सातशे रुपये, तर क वर्ग कलावंतांस दोन हजार दोनशे पन्नास रुपये मानधन आहे. या योजनेचे लाभार्थी कलाकार (पान ४ वर)

## आ.आमश्या पाडवींचा शिंदे शिवसेनेत प्रवेश खा.डॉ.हीना गावितांना फायदा पोहचवणारी खेळी



**नंदुरबार, दि.१७– उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे विधान परिषदेचे आमदार आमश्या पाडवी यांनी शिंदे गटात दुपारी तीन वाजेला १०० कार्यकर्त्यांसह मुंबईत प्रवेश केल्याने उबाठा शिवसेनेला धक्का बसला आहे. दुसरी उत्तीर्ण असलेल्या पाडवी यांना सर्वांचा विरोध झुगारून उध्दव ठाकरे यांनी आमदारकी दिली होती. मात्र रविवारी पाडवी यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.पाडवी यांच्या प्रवेशाने लोकसभेच्या भाजपाच्या उमेदवार डॉ हीना गावित यांना मोठा फायदा होणार आहे. तर रघूवंशी व पाडवी हे दोघे महत्वाकांक्षी नेते एकाच मॅनमध्ये कसे राहणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

आमशा पाडवी हे आदिवासी लढवैय्या कार्यकर्ते आहेत,म्हणून उध्दव बाळासाहेब ठाकरे गटात चंद्रकांत रघूवंशी यांना डावलून पाडवी यांच्या गळयात उबाठा सेनेने आमदारकीची माळ घातली होती. रघूवंशी यांच्यासह बारा आमदारांची नावे राज्यपालांनी झुगारल्याने रघूवंशी यांचे आमदार होण्याचे स्वप्न भंगले. तर रघूवंशी ऐवजी फूकटात आमदार होण्याचे स्वप्नातही विचार न केलेल्या पाडवींना आमदार होता आले. राहूनही आमशा पाडवी यांची भाजपाशी सलगी होती. भाजपाची सत्ता असलेल्या जि.प.मध्ये आमदार पाडवी यांचे चिरंजिव शंकर पाडवी हे सभापती आहेत.लोकसभा निवडणूकीत भाजपाच्या उमेदवार डॉ हीना गावित आहेत.उबाठा सेना ही महाविकास आघाडीत आहे.त्यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला नसता तर यंदाच्या निवडणूकीत आमशा (पान ४ वर)

## दर्शन घेवून परतणाऱ्या भाविकांवर काळाचा घाला अ.कुवा जवळ अपघात; दोन ठार सतरा जखमी



**शिरपूर दि.१७ (का.प्र.) : नंदुरबार जिल्ह्यातील क्षेत्र देवमोगरा येथील देवीचे दर्शन घेऊन परत येण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या वाहनाचा टायर फुटून झालेल्या अपघातात दोन ठार तर १७ जण जखमी झाले. सर्व मृत व जखमी तालुक्यातील बोराडी येथील रामनगरमधील रहिवासी आहेत. हा अपघात १६ मार्चला सायंकाळी अक्कलकुव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर खापर ते उदापूर गावादरम्यान घडला.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बोराडीच्या रामनगर भागातील रहिवासी पिकअपने १५ मार्चला देवमोगरा देवीच्या दर्शनासाठी गेले होते. १६ मार्चला ते परत येत असतांना पुलावर पिकअपचा टायर फुटला. त्यामुळे अनियंत्रित पिकअप पुलाखाली उलटली. या अपघातात चंद्रसिंह रामदास पावरा (वय ३९) व दारासिंह बुधा पावरा (वय ५६) जागीच ठार झाले. हिरालाल आजऱ्या पावरा, सुनिल हुसन्या पावरा, दादू पावरा, गायत्री राजू पावरा, उषा पावरा, कालूसिंह जामसिंह पावरा,संजय बडे, बायनू पावरा, दीपक रणसिंह पावरा, रामबाई रामसिंह पावरा, देवा दला पावरा, भरत देवा पावरा, भारती राजू पावरा, बल्या लालसिंह पावरा, कुणाल मुकेश पावरा, रूपाली तुषार पावरा जखमी झाले. आमदार आमश्या पाडवी यांच्यासह परिसरातील वाहनचालक आणि भाविकांनी मदतकार्य करुन त्यांना रुग्णालयात दाखल केले. अपघातामुळे राम नगर परिसरावर शोककळा पसरली (पान ४ वर)



## हलगर्जीपणा व दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही- आयुक्त दगडे-पाटील

**धुळे, दि.१७– लोकसभा सार्वत्रिक निवडणुक प्रक्रीया जाहिर करण्यात आल्याने आचार संहितेसंदर्भात उपाय योजना, व कार्यवाहीबाबत आयुक्तांच्या दालनात सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार करावयाच्या कामांमध्ये कोणताही हलगर्जीपणा व दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. अशी तंबी प्रशासक तथा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी विभाग प्रमुखांना दिल्या आहेत.**

महापालिकेमार्फत आचारसंहिता संदर्भात (पान ४ वर)

## जि.बँक शेतकऱ्यांना पिक कर्ज शुन्य टक्के व्याजाची सवलत देणार नविन पिक कर्ज मिळण्यासाठी मागील परतफेड करा- कदमबांडे

**धुळे, दि.१७– धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सभासदांनी नविन पिक कर्ज प्राप्त करण्यासाठी दि.३० मार्च २०२४ पर्यंत आपल्याकडील मागील वर्षाचा पिक कर्जाची परतफेड बँक धोरणाप्रमाणे फक्त घेतलेल्या मुद्दल रक्कमेची परतफेड तात्काळ करावी. असे आवाहन करत बँकेने शुन्य टक्के दराने व्याजसवलत देण्याचे निश्चित केलेले असून दि.१० एप्रिल २०२४ पासून नविन पीक कर्ज वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे यांनी दिली आहे.**

जिल्हास्तरीय तांत्रिक समितीची सभा घेवून पिका कर्ज दराला मंजूरी घेण्यात आली आहे. शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी कापूस पिकासाठी ऐंशी हजार, केळी पिकासाठी एक लाख सव्हीस हजार तर पपई साठी एक लाख वीस हजार याचा समावेश आहे. नाबार्डच्या धोरणाप्रमाणे बँक पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मच्छिमारीसाठी नवीन पर्सनालाईज्ड एटीएम डेबीट कार्ड द्वारे कर्ज वाटर करण्यात येणार आहे. संचालक मंडळाच्या निर्णयानुसार, बँक कृषीपुरक उद्योगासाठी वैयक्तीक व सहकारी संस्थामार्फत कन्झम्शन कर्ज २०२४-२५ च्या पिककर्ज वाटपाच्या रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे तीन लाखांपर्यंतचे कर्ज वाटप होणार आहे. संपूर्ण कर्ज वाटप नवीन पर्सनालाईज्ड एटीएम डेबिट कार्ड द्वारे कर्ज वितरण करण्यात येणार आहे. या सवलतीचा लाभ सभासदांनी घ्यावा. पिक कर्जाची परतफेड तात्काळ करावी असे आवाहन धुळे व नंदुरबार जिल्हा बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे, उपाध्यक्ष दीपकभाई पाटील, संचालक मंडळ, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धिरज चौधरी, सर व्यवस्थापक ए.एम.सिसोदे यांनी केले आहे.

## मो.सायकल घसरल्याने अपघात; एक जखमी

धुळे, दि.१७– धुळे तालुक्यातीली मोघण ते कुळथे रस्त्याने भरधाव वेगाने जाणारी मोटर सायकल घसरल्याने अपघात झाला. या अपघातात मोटर सायकलवरील इसम खाली कोसळल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

चेतन कैलास माळी यांनी दि. १६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे तालुक्यातील हेंद्रुण येथील सोमसिंग अभिमन राजपूत व कैलास लालचंद माळी रा.मोघण, ता.जि.धुळे हे दोघेही मोटर सायकल क्र. एमएच १८/ सीसी- ३९४६ वरून मोघण शिवारातील कुळथे रस्त्याने दि.७ मार्च रोजी साडेआठ वाजेच्या सुमारास भरधाव वेगाने जात होते. धनंजय माळी यांच्या शेताजवळ भरधाव वेगाने (पान ४ वर)

## नकाणे तलावातील गाळ काढण्यास प्रारंभ नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून खोलीकरण



**धुळे, दि.१७– धुळे शहराला पाणीपुरवठा करणारा नकाने तलाव या तलावाचे गाळ काढून खोलीकरणाचे कामास नाम फाउंडेशनच्या माध्यमातून प्रारंभ करण्यात आला आहे.**

नकाणे तलाव येथील गाळ काढण्याच्या कामाच्या शुभारंभ प्रसंगी धुळे शहरातील जिल्ह्यातील प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ डॉ.राहुल सुभाष भामरे व प्रसिद्ध हृदयरोग सर्जन डॉ.श्री यतीन वाघ, एस.डी.आर.एफ. चे डी. वाय.एस.पी.पारस्कर, पीएसआय शिंदे, मदन बाविस्कर, ओंकार पाटील, मोराणे गावाचे युवा नेतृत्व मयूर ठाकरे, पराग ठाकरे व नाम फाउंडेशनचे जिल्हा (पान ४ वर)

## डंपरने घेतला शाळकरी मुलीचा बळी

नंदुरबार,दि.१७– शहरातील नेहा पार्क येथे राहणाऱ्या दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या डिंपल सतीश सोनार या विद्यार्थिनीला एका डम्परणे जोरदार धडक दिल्यामुळे ती गंभीर जखमी होवून तिचा मृत्यू झाला आहे. साई कोचिंग क्लासेस येथून क्लास करून सायकलीने घरी परतत असताना धुळे चौफुली येथे जी जे १६ ए डब्लु ६६८८ या डंपर ने तिला जोरदार धडक दिली त्यामुळे ती सायकली सह खाली कोसळली , गाडीने तिला फरफटत नेले यात ती गंभीर जखमी झाली असून तिला जिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. उपचार घेत असताना तिची प्राणज्योत मालवली. धुळे चौफुलीवर खड्डे झाले असून या भागात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तात्काळ खड्डे बुजण्याची मागणी नागरिकांकडून केली जाते आहे.

## बेपत्ता वाहकाचा तीन दिवसानंतर नांदर्डे जवळ मृतदेह आढळला

**शहादा,दि.१७(का.प्र.)– बाजारातून किराणा घेऊन येतो असे सांगून गेलेल्या तीन दिवसापासून बेपत्ता ५३ वर्षीय वाहक म्हणून कार्यरत इसमाचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत तालुक्यातील नांदर्डे ते त-हावद रस्त्या दरम्यान असलेल्या पुलाखाली आढळल्याने खळबळ उडाली आहे.शहादा पोलिसांत मयताच्या मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञाता विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना शहादा पोलिसां समोर आव्हान ठरली आहे.**

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि.१३ मार्च रोजी शहादा आगारातील वाहक राजेंद्र उत्तमराव मराठे (वय ५३ राहणार सदाशिव नगर शहादा) हे दुपारी चार वाजेच्या सुमारास किराणा घेऊन येतो असे सांगून घराच्या बाहेर पडले. शहरातील भाजी मंडईतील युनियन बँकेसमोर असलेल्या एका किराणा दुकानात त्यांनी किराणा सामानाची यादी दिली. तेथून ते कुठे गेले, कसे गेले हे काहीच कळले नाही. कुटुंबीयांनी त्यांचा इतरत्र शोध घेतला मात्र ते आढळून आले नाही. यावरून शहादा पोलिसात मिसिंग अन्वये घटनेची नोंद करण्यात आली होती.दरम्यान दि.१६ मार्च रोजी रात्री साडेसात ते आठ वाजेच्या दरम्यान पोलीस हेल्पलाइन नंबर ११२ वर अज्ञात इसमाने कॉल केला.त-हावद ते नांदर्डे या गावांना जोडणाऱ्या पुलाखाली एका पुरुषाचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत दिसत आहे. या माहितीवरून पोलीस निरीक्षक शिवाजीराव बुधवंत यांच्यासह कर्मचाऱ्यांचे पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट दिली. तेथे त्यांना सदर मृतदेह आढळून आला.त्याचे इतर अवयव परिसरात अन्य ठिकाणी विखुरलेले (पान ४ वर)

## ब्राह्मण समाजाची आज व्यापक बैठक

धुळे, दि.१७– शहरातील समस्त ब्राह्मण समाजाची उद्या सोमवारी दि.१८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता देवपूरातील प्रोफेसर कॉलनीतील मनकर्णिका भवनात बैठक होणार आहे.

या बैठकीत २४ एप्रिल रोजी मनकर्णिका भवनात होणारा सामुहिक व्रतबंध सोहळा, १० मे रोजी भगवान परशुराम जयंती आणि १२ मे रोजी दाते रिजेन्सीमध्ये होणारा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याबाबत चर्चा करून नियोजन करण्यात येणार (पान ४ वर)

## आता लक्ष्य एकच- नार-पार प्रकल्पाची स्वप्नपूर्ती- खा.डॉ.भामरे कापडणेसह परिसरातील ३८ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन



**धुळे, ता.१७– खासदारकीच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात लोकसभेच्या धुळे मतदारसंघातील नव्वद टक्क्यांहून अधिक सिंचनाचे प्रलंबित प्रकल्प- योजना मार्गी लावण्यात यश आल्याचे समाधान आहे. याशिवाय राष्ट्रीय महामार्ग, धुळे-नरडाणा रेल्वेमार्गासह कोट्यवधी रुपयांच्या निधीतून मतदारसंघात विकासकामे केली. आता पक्षाने तिसऱ्यांदा उमेदवारीची संधी दिली असून, या संधीचे सोने करण्यासाठी एकाच लक्ष्याची ध्येयपूर्ती करायची आहे, ती म्हणजे संपूर्ण उत्तर महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम करणाऱ्या नार-पार प्रकल्पाची मुहूर्तमेढ, असे प्रतिपादन खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी केले.**

कापडणे येथे महामार्ग क्रमांक ६० ते लोणकुटे-धनूर-कापडणे-न्याहळोद ते जापी रस्त्याचे डांबरीकरण करणे, न्याहळोद-कापडणे-सोनगीर रस्त्याचे डांबरीकरण, न्याहळोद-कापडणे-कौठळ-मोहाडी प्र. डांगरी रस्त्याचे डांबरीकरण व पांझरा नदीवर पूल बांधणे, जलजीवन मिशनअंतर्गत कापडणे गावासाठी पाणी योजना व जलशुद्धीकरण केंद्र, जलकुंभ बांधणे, कापडणे परिसरातील पाणंद रस्ते तयार करणे, आदी ३८ कोटी रुपयांच्या निधीतील कामांचे भूमिपूजन खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. या कामांसाठी जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती रामकृष्ण खलाणे व भाजपचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे यांनी खासदार डॉ. भामरे यांच्याकडे पाठपुरावा केला.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अरविंद जाधव, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, भाजपचे प्रदेश प्रवक्ते संजय शर्मा, सरपंच सोनीबाई भिल, उपसरपंच महेश माळी, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, भाजपचे ओबीसी आघाडीचे आर.के. माळी, ज्ञानेश्वर चौधरी, मुन्नाभाऊ वाडीले, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण पाटील, श्रद्धा पाटील, राजेंद्र महाजन, सुनील शिंदे, चंद्रशेखर माळी, अशोक सुडके, राजेश पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार डॉ. भामरे म्हणाले, की तुमच्या आशीर्वादाने खासदार झाल्यानंतर सर्वांत आधी मतदारसंघातील सिंचनाचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले. यात सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेचे काम ८० टक्क्यांपर्यंत पूर्णत्वास आले असून, या योजनेद्वारे धुळे (पान ४ वर)

## फार्म.कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

शिरपूर, दि.१७– तालुक्यातील दहिवद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठतर्फे डिसेंबर २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या प्रथम सत्र (बी. फार्मसी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून येथील टी .एस. बी इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन आणि रिसर्च दहिवद,शिरपूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. फार्मसी शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून फार्मसी शाखेच्या प्रथम वर्ष बी. फार्मसीची स्नेहा संजय निकम प्रथम क्रमांक, कार्तिक जगदीश पाटील द्वितीय क्रमांक, स्वप्निल सनद पाटील तृतीय क्रमांक मिळविला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.धिरज बाविस्कर, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. तुषार साळुंके यांच्यासह सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.


प्रथम पुण्यस्मरण



कै.आण्णासाहेब डॉ.सुधाकर मोतीराम बोरसे

(स्वर्गवास दि. १८/०३/२०२३)

अध्यक्ष - अभय युवा कल्याण केंद्र, धुळे

तुमचं असणं आमच्यासाठी सर्वस्व होतं,
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं।
आता सर्व काही असण्याची जाणीव आहे,
पण तुम्ही आमच्यात नाही हीच मोठी उणीव आहे ॥

✻ शोकाकुल ✻

श्री.संजय लोटनराव पवार (मुख्याध्यापक)

सौ.मनिषा रंगराव पाटील — श्री.जयवंत बाबुराव सोनवणे
श्री.सुनिल लोटन ठाकरे — श्री.किरण पितांबर पाटील
श्रीमती संगिता कन्हैयालाल मोरे — श्री.शालिक लक्ष्मण बोरसे
श्री.मनोहर साहेबराव पाटील — श्री.मोहन सहादू सुळ
श्री.अनिल शंकर चव्हाण — श्री.योगेश पंढरीनाथ देसाई

श्रीमती सुनंदा विश्वास पाटील

राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, अनमोल नगर,देवपूर, धुळे

# आपला महाराष्ट्र

## पाच टप्प्यातील निवडणूक आणि अनुत्तरीत प्रश्न

अखेर सात टप्प्यात देशात लोकसभा निवडणूक होणार आहे. तर महाराष्ट्रातील निवडणूक पाच टप्प्यात होईल. शेवटच्या टप्प्यात धुळे ,दिंडोरी, नाशिक, पालघर, ठाणे, आणि मुंबईतील सहा लोकसभा मतदार संघातून मतदान होईल.मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिल्लीतील विज्ञान भवनात पत्रकार परिषद घेतली. एखाद्या राजकीय पुढा–यास शोभावी अशा पध्दतीची ही परिषद होती. असे म्हणण्याचे कारण म्हणजे ज्या पध्दतीने त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तरे दिली ती पूर्णपणे गोलगोल आणि पुढारी टाईप होती. एका महिला पत्रकाराने मागील निवडणुकीतील आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह लावत विचारले की, सत्ताधारी पक्षाच्या शिर्षस्थ नेत्यांनी केलेल्या अनेक वक्तव्यामुळे आचार संहितेचे उल्लंघन झाले. त्या विषयी केलेल्या तक्रारी आयोगाने खारीज केल्या किंवा त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कारवाई केली. तेव्हा त्यावर आयुक्तांनी त्वेषाने उत्तर देत तुम्ही आयोगावर आरोप लावत आहात असे म्हटले. पण दिलेल्या उत्तरात विचारलेल्या प्रश्नाचा काहीच तपशील नव्हता. याच पध्दतीचा प्रश्न सात टप्प्यांचा होता. एवढे टप्पे करण्याची गरज काय ? या प्रश्नावर निवडणूक आयुक्तांनी जे सांगितले ते अनाकलनीय होते. ते म्हणाले की, देश मोठा आहे. सुरक्षा विषयक कुमक एवढी नाही. सण वार आहेत ,नद्या नाले आहेत. बर्फ आहे. पाऊस आहे. त्यानुसार व्यवस्था बघणे आवश्यक आहे. वास्तविक या पूर्वीही अनेक वेळा निवडणुका झालेल्या आहेत. दोन किंवा तीन टप्प्यात त्या संपन्न झाल्या. त्या काळात कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. मग आताच का अडचणींचा पाढा आयुक्त वाचतात. असे प्रश्न उपस्थित झाले पण त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. आयुक्त गोयल यांच्या राजीनाम्याचे मुद्दे उपस्थित झाले. त्याबद्दल राजीव कुमार म्हणाले की, आयोगात मतभेद तर असलेच पाहिजेत. तसे ते गोयल यांच्या बाबतही झाले आहेत. याचा अर्थ आयोगात सगळे काही आलबेल नाही. स्वतंत्रपणे आपले मत व्यक्त करण्यास वाव नाही. केल्यास राजीनामा द्यावा लागतो. निनावी निवडणूक रोख्यांच्या प्रश्नांना त्यांनी पध्दतशीर बगल दिली. शिवाय शेर शायरी करीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आम्ही आमचे काम केले. बाकीचा तपशील सुध्दा लवकरच आमच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल. आयुक्तांनी दिलेले हे उत्तर सफाईदार होते.अर्थात हे मुद्दे त्यांना विशेषत्वाने चर्चेत घेता येणार नाहीत. पण माध्यमातून देखील त्याबद्दलची चर्चा हवी तशी होतांना दिसत नाही. एकंदरीत बड्या भांडवलदारांच्या हातात असलेल्या प्रिन्ट मीडियावर काहीच भाष्य नाही उमटणार. तसेच ईलेक्ट्रॉनिक माध्यमांवर सुध्दा यावर चर्चा होणार नाही. जणू काहीच घडले नाही अशा पध्दतीने जगातील सर्वात मोठ्या रोखे स्कॅमवर कोणीच रान उठवणार नसतील तर सगळे लाचारीने पछाडले आहेत असे समजायला हरकत नसावी.

आताच निवडणूक जाहीर झाल्याने आणि तसा भरपूर वेळ असल्याने योग्य वेळ येताच विरोधी आघाडी या मुद्यांचा उहापोह करेल यात शंका नाही. मीडियावर काहीच येणार नसले तरी सोशल मीडियावर भरपूर काही आदळते आहे. प्रत्येकाच्या खिशात मोबाईल नावाचा प्राणी असल्याने प्रत्येक जण फिलॉसॉफर आहे. लेखक, संशोधक, पत्रकार आहे. गेल्या तीन चार दिवसांपासून माध्यमांपेक्षा सोशल मीडियावरच हा मुद्दा गाजत आहे. तसा तो पुढेही गाजेल. बाकीचे चाटुगिरी करण्यातच वेळ घालविणार आहेत. म्हणून निवडणुकीतील मूलभूत प्रश्नांची उत्तरे अनुत्तरित राहणार आहेत. सगळी मदार निवडणूक प्रचारावरील भाषणांवर आणि सोशल मीडियावर आहे. कारण जेव्हा कोणीच सोबत करायला तयार नसतो तेव्हा लोकांमध्ये जाऊन पोहचणे हाच उपाय आहे. आणि त्यावर कोणी निर्बंध आणू शकत नाही. मुद्दे तर खूप आहेत. एकट्या इलेक्टोरल बाँडचेच डझन दोन डझन असतील. त्यावर सत्ताधारी तर समर्थन करतानाच खूप चिडतात. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे वक्तव्य त्यासाठी पुरेसे आहे. परवा भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या दिवशी राहुल गांधींनी नेमके वरमावर बोट ठेवले. ते इतके जिव्हारी लागले की, उपमुख्यमंत्री अक्षरश: चिडलेले होते. ते म्हणाले की, कॉंग्रेसला काळा पैसा हवा आहे. म्हणून अशी वक्तव्ये ते करतात. प्रश्न पत्रकाराने असाच केला होता की, राहुल गांधींनी तुमच्यावर आसूड ओढले आहेत, तुमचे काय म्हणणे आहे? त्यावरचे उत्तर देतानाचा उप मुख्यमंत्र्यांचा आवेश बघण्यासारखा होता. वास्तविक निवडणूक रोख्यांचा तपशील जो झपाट्याने बाहेर येत आहे. त्यात सर्वाधिक रकमा सत्ताधारी पक्षाला मिळालेल्या आहेत. त्यावरचे प्रश्न उपस्थित न करता राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मुंबईचे पत्रकार प्रश्न विचारतात. याचा अर्थ लक्षात घेणे गरजेचे आहे. लांगुल चालनाच्या सर्व मर्यादा मुंबईच्या मीडियाने ओलांडलेल्या आहेत. त्यांच्या पेक्षा जिल्हा जिल्ह्यातील छोटी छोटी माध्यमे केव्हाही चांगली. त्यांचा कणा वाकलेला नाही. ताठ आहे. ही छोटी माध्यमेच निवडणुका जिंकून दाखविणार आहेत. त्यांचे नेटवर्क उभे करून त्यांना सामुदायिक पणे कसे जगता येईल. याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना मदतीची अधिक गरज आहे

रोखे प्रकरणात नुकतीच एक बातमी प्रसवली. ती फार महत्वाची आहे. ज्या पक्षाने गायीला मातेचा दर्जा दिला. तिच्या पोटात ३३ कोटी देव असल्याचा प्रचार हवा तेव्हा केला. त्याच गाईचे मांस अथवा बिफ सप्लाय करणा–या कंपन्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर रोखे खरेदी झाली त्याचा उहापोह निवडणूक प्रचारातून योग्य वेळी होईल. ईडीच्या धाडी, आयकर विभागाचे छापे, सीबीआय ची चौकशी, या तारखा आणि रोखे वटविण्याच्या तारखा जुळून आल्या. त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध कशासाठी यासंबंधीचा तपशील लवकर जाहीर व्हावा असा सूर आहे. सर्वोच्च न्यायालय त्यात हस्तक्षेप करेल. ईडी, प्राप्तीकर खाते यांनी सुरू केलेली चौकशी एका बाजुला त्याच वेळी झालेला रोखे व्यवहार दुसऱ्या बाजुला करण्याची कुशलता दाखवित सरकार नामा निराळे होण्याचा प्रयत्न करीत आहे.

## दोन लाखांसाठी विवाहितेचा छळ

धुळे, दि.१७– शिरपूर शहरातील विवाहितेने किराणा दुकान घेण्यासाठी माहेरून दोन लाख रूपये आणावे या कारणावरून छळ केला असल्याची घटना समोर आली आहे.

पिडीत विवाहितेने दि.१६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, नंदुरबार जिल्हा शहादा तालुक्यातील हिंगणी गावातील हिरालाल बापू ईशी, बापू सोनू ईशी, सुरेखाबाई बापू ईशी, मच्छिंद्र बापू ईशी, विनोद बापू ईशी या पाच जणांनी किराणा दुकान घेण्यासाठी माहेरून पाच लाख रूपये आणावेत असा तगादा लावला. पैसे न आणल्याने २०१९ ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीत शिवीगाळ करत शारीरिक, मानसिक छळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अंगावरील स्त्रीधन काढून घेतले व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशनला सासरच्या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उंभरेत जिल्हा प.शाळेत असाक्षरांची परीक्षा संपन्न

**साक्री (प्रतिनिधी):– साक्री तालुक्यातील उंभरे जि.प.शाळा इंदिरा नगर येथे एलआयएलपी अंतर्गत भारत सरकारच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार गावातील १५ ते ३५ वयोगटातील असाक्षर स्त्री–पुरुषांची परिक्षा घेण्यात आली.**

गेल्या एक महिन्यापासून साक्षरतेचे वर्ग सुरू होते आणि त्यांच्यासाठी भाषाज्ञान आणि गणिती क्रिया यासाठी रोज रात्री एक तास २ स्वयंसेवक शिकवत होते. त्यांची दि.१७ मार्च रोजी परीक्षा घेण्यात आली. नऊ पुरुष व नऊ स्त्रिया असे एकूण अठरा असाक्षर यांच्यासाठी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेसाठी असाक्षर आणण्यासाठी दोन स्वयंसेवक एक पर्यवेक्षक केंद्र संचालक एक मदतनीस अशा पद्धतीने परिक्षा केंद्राची परिक्षा अक्षरांना ठराविक अंतराने बसून घेण्यात आली दीडशे मार्कांचा पेपर तीन विभागात विभागलेला होता. पेपर शासनाकडून आलेला असताना अतिशय काटेकोरपणे परीक्षा पार पडली. परीक्षा यशस्वी करण्यासाठी केंद्र संचालक अनिल अहिरे, भटु भदाणे, विठ्ठल भोई, सागर अहिरे, जागृती शेवाळे आदींनी परिश्रम घेतले.

## मौलवींच्या हस्ते बोअरवेल सुरू

**धुळे, दि.१७– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या ५० बोरवेल पैकी १६ क्रमांकाची बोरवेल धुळे शहरातील अन्सार नगर पूनम टॉवर तिरंगा चौक येथे लोकअर्पण सोहळा परिसरातील मौलवी साहेब यांच्या हस्ते करण्यात आला**

त्यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस इर्शाद भाई जहागिरदार धुळे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, सुरेश अहिरे, समीर खान, चेतन पाटील, भूषण ब्राह्मणे, अभिजीत देवरे, महेश भामरे, मोबीन अन्सारी, मुस्ताफा अन्सारी, शब्बीर अहमद राईस अहमद, सुफियान अहमद, मोहम्मद इक्बाल, भैया इमरान भाई, अब्दुल मजीद, सुलताना मॅडम, शमीम आपा, जाहिदा आपा, हमिदा आपा, जुबेदा आपा, जइबूनिसा आपा, रेहाना बानो, हिना बानो परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## शहादा महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन

शहादा,दि.१७(का.प्र.)– पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शहादा जि. नंदुरबार येथे दि.१९ मार्च रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय शहादा आणि आयक्यूएसी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०: थीम अँड प्रोस्पेक्ट्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी प्रा.डॉ.आर.एस. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. तरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक डॉ. एम. के. पटेल आणि आयोजन समितीच्या वतीने प्राध्यापकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### CHANGE OF NAME

I have Change My Name
From Old Name
**SAMINA BANO NASEEM AKHTAR**
to My New Name
**SAMEENA BANO NASEEM AKHTAR ANSARI**
as per Documents
**Address- H.NO.2742, LANE NO.05, GHADIYAL MASJDI, DHULE**

### CHANGE OF NAME

I have Change My Name
From Old Name
**SAMINA BANO NASIM AKHTAR ANSARI**
to My New Name
**SAMEENA BANO NASEEM AKHTAR ANSARI**
as per Documents
**Address- H.NO.2742, LANE NO.05, GHADIYAL MASJDI, DHULE**

### NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**SARFARAZ AHMED MOHAMMAD AARIF**
MY NEW NAME IS
**SARFRAZ AHMAD MOHAMMAD AARIF ANSARI**
**ADD- MUSLIM NAGAR, DHULE**

### CHANGE OF NAME

I have Change My Name
From Old Name
**NASIM AKHTAR ALIM AKHTAR ANSARI**
to My New Name
**NASEEM AKHTAR ALEEM AKHTAR ANSARI**
as per Documents
**Address- H.NO.2742, LANE NO.05, GHADIYAL MASJDI, DHULE**

### CHANGE OF NAME

I have Change My Name
From Old Name
**RAIS AHMED SAEED AHMED**
to My New Name
**RAEES AHMED SAEED AHMED ANSARI**
as per Documents
**Address- GALLI NO.07, MACHHI BAJAR, DHULE**

### CHANGE OF NAME

I have Change My Name
From Old Name
**SUMAIYA UMAIR ANJUM ANSARI**
to My New Name
**SUMAIYA PARVEEN UMAIR ANJUM ANSARI**
as per Documents
**Address- C/O UMAIR ANJUM ANSARI 2318, TASHA GALLI, DHULE**

अर्जदार तर्फे ॲडव्होकेट, वाय.आर.परमार
नि.६/ड

### जाहीर नोटीस

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) यांच्या कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.७२/२०२४

१) वत्सलाबाई गोरख पाटील, उ.व.७३, व्यवसाय– घरकाम,
रा.शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे.
ह.मु.दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही
कै.वामन केसरा पाटील, (मयत) ..... **जाबदेणार**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांचे मयत वडील कै.वामन केसरा पाटील, हे दि.१४–०९–२००६ रोजी मौजे शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे. येथे मयत झाले असून त्याच्या मृत्यूपश्यात त्यांना वरीलप्रमाणे नमूद अर्जदार हीच वारस असून अर्जदार शिवाय अन्य कोणीही वारस नाही, असा वारस दाखला अर्जदाराला शासकीय कामासाठी व शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असून सदर वारस दाखला अर्जदार यांनी मे.न्यायालयात दिवाणी कि अर्ज नं.७२/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाची सुनावणी कामी दि.२६/४/२०२४ रोजीची तारीख ठेवली आहे. तरी सदर कामी कुणाची काही हरकत म्हणणे असल्यास त्यांनी सदर तारखेस सकाळी ठीक १०:३० वाजता स्वत; अगर प्रतिनिधी, वकील याच्यामार्फत या न्यायालयात हजर होऊन आपले लेखी म्हणणे, हरकत सादर करावयात मुदतीत कोणाचीही काही हरकत न आल्यास पुढील सुनावणी होऊन चौकशी होऊन अर्जदारांना वारस दाखला देण्याबाबत अर्जाची सुनावणी घेवून अर्जदारांना वारस दाखला देण्याबाबत अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येऊन अर्जदारांना मायताचे वारस असल्यासंबधी वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू जाहीर नोटीस मे न्यायालयाच्या आदेशा वरून प्रसिद्धीस दिली आहे.
शिंदखेडा, ता.१६/०३/२०२४

आदेशावरून

**(कामगिरी कारकून)**
कोर्टाचा शिक्का
**(सहाय्यक अधिक्षक)**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे**

ॲड.ए.एन.शखे, शिंदखेडा, जि.धुळे
मो.नं.९४२१६१५९१७

### जाहीर नोटीस

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज (ज्यु.डी.) यांचे न्यायालयात**

दिवाणी कि.अर्ज नं.६९/२०२४

१) मिनाबेन कांतीलाल पाखले, उ.व.६२, धंदा– घरकाम,
रा. A-402, ऋषिकेश अव्हेन्यु, अपोझिट गायत्री नगर,
नवागाम डिंडोली, पो.उधना, जि.सुरत–३९४२१०
२) भटु दत्तात्रय कोतकर, उ.व.५५ धंदा–शेती, मो.नं.९९२३४७०५६५
रा.मुडावद ता.शिंदखेडा, जि.धुळे–४२५४०३
३) राजेंद्र दत्तात्रय कोतकर, उ.व.५१, धंदा– शेती, मो.नं.८१६००५४९९४
रा.महावीर नगर, बेटावद, ता.शिंदखेडा, जि.धुळे ४२५४०३
४) योगिता महेश शेंडे, उ.व.४९, धंदा– घरकाम, रा.अनुष्का अपार्टमेंट, रो हाऊस नं.९, तोरणा नगर, बिहाइंड ऊर्दु स्कूल, पवन नगर, सिडको, नाशिक. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

XX

१) कै.दत्तात्रय महादेव कोतकर, (मृत्यू ता.२०/०५/१९९०),
२) कै.सुमनबाई दत्तात्रय कोतकर, (मृत्यू ता.०६/०२/२०२४) ..... **मयत**

ज्या अर्थी अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत कै.दत्तात्रय महादेव कोतकर व मयत कै.सुमनबाई दत्तात्रय कोतकर यांचे अनुक्रमे अर्जदार क्र.१ मुलगी अर्जदार क्र.२ व ३ मुले व अर्जदार क्र.४ मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ४ यांना यांना शासकीय, निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी वारस दाखला आवश्यक असल्याने, अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे सेक्शन २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणेबाबत मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार नं.१ ते ४ यांचे व्यतीरीक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायलयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दिनांक २०/४/२०२४ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहुन लेखी हरकती सादर करावयात अन्यथा सदरील अर्जदार नं १ ते ४ यांचा तोंडी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदार यांचे व्यतीरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येऊन मयताचे वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार नं १ ते ४ यांनी मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायधिश क.स्तर साो. शिंदखेडा जि.धुळे यांचे आदेशावरुन सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, शिंदखेडा**
कोर्टाचा शिक्का
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिंदखेडा**

### टायटल व्हेरीफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्यां तथा इतर सर्व वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी धुळे जिल्हा परीषद धुळे व तालुका पंचायत समिती धुळे अंतर्गत, मौजे महाल काळी, ता.जि.धुळे येथील गट नं.१५४/१, ज्यासी क्षेत्र हे. २.८६ आर, पो.ख.०.०० आर असे एकूण हे. २.८६ आर, ज्यासी आकार रू.१०.८५ पैसे, ज्यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे ....

वर नमूद वर्णनाची शेतमिळकत ही श्री.भिकचंद भवरीलाल जैन, रा– नेर ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून महसुल दप्तरी ७/१२ उताऱ्यावर मालक व कब्जेदार सदरी त्यांचे नाव लागलेले आहे. तसेच सदर मिळकत धारक यांनी वर नमूद मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याचा भरवसा देखील दिला आहे. सदर मालकांनी आमच्याकडे सदर मिळकती हया पणन योग्य असल्याचा दाखला मागितला आहे.

सबब सदर शेतमिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध तसेच विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपटटा, वहीवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, भाडेपटटा, मृत्यूपत्र, करार, कौटुंबिक तजविज, जप्ती, आरक्षण किंवा कोणतेही दायीत्व किंवा बांधीलकी, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकसन करारनामा, देवाण–घेवाण, बेचेनपत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकती ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि/अथवा स्वारस्य असलेले पतदार, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी, स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरूपातील वर नमूद मिळकत किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप, असल्यास कृपया लेखी स्वरूपात पृष्टयर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत निम्नलिखीत स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील नमूद केलेल्या पत्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी आक्षेप/हरकती नोंदवाव्यात. सदर मुदतीत कोणतीही लेखी आक्षेप/हरकत न आल्यास वर नमूद मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत, हस्तांतरणीय आहे असे समजून वरील प्रमाणे सदर मिळकत पणन योग्य असल्याचा दाखला दिला जाईल. मग कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही व मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तसेच दाखविलेल्या कागदपत्रांवरून प्रसिध्द करण्यात येत आहे. कळावे,

ही टायटल व्हेरीफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस

**धुळे, दिनांक– १८/०३/२०२४.**

**ॲड.प्रविण बी.कुलकर्णी**
४, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, जिल्हा न्यायालयासमोर, धुळे.
**मो.नं.९३२५२५२१७७**


BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI
2K CHRISTIE DOLBY DIGITAL




ता १६से रोज ३ खेल टा. ३,६,९ बजे
शैतान
| तिकीट | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| दर | ८० रु. | ८० रु. | १३० रु |

ONLINE TICKET BOOKING OPEN
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

**शब्दकोडे क्रमांक.१८८२**




**आडवे शब्द :** १.राज कपूर यांचा एक सिनेमा ३.मुलायम ५.कंबर ८.निवाला ९.आपला देश १०.ताकदवर १२.रंग बदलणारा जीव १३.हाक १४.हिंदीत-मुलगा १६.स्वतंत्र १८.संजय दत्त,कुमार गौरव यांचा एक सिनेमा १९.कर्म २१.न्हाव्याचे अवजार २३.चुकीचा २५.सावली २७.विष २८.परमेश्वराने धरतीवर घेतलेले रूप ३०.वन ३१.कलाकारास दर्दी रसिकांकडून मिळालेली पसंतीची पावती ३२.कलंक ३३.भीती ३४.माधवाचा एक अवतार ३६.हिंदीत-रात्र ३७.अमेरीकेचे अवकाश संशोधन केंद्र ३९.हिंदीत-घाम ४०.सरळ स्वभावाचा ४१.हार ४२.लआ-उलट लिहा ४३.प्रामाणिकपणा ४५.पाय ४६.सांगावा ४७.पथ ४८.लेहंगा ५०.नोकर ५१.समुह

**उभे शब्द :** १.पुढाकार,बढती २.वावर ३.शुष्क ४.विचार ५.समय ६.प्रश्न ७.इंग्रजी महीन्यातील पाचवा महीना ९.भरभक्कम १०.नावाला लागलेला बटटा ११.गरजवंत १२.आरास १५.मजदूर १७.नाही - विरूदध २०.अस्ताव्यस्त पडलेले सामान २२.लालू प्रसाद यादव यांच्या पक्षाचे संक्षिप्त रूप २३.घटना २४.पहाटे खिडकीतून येणारे सुर्यकिरण २६.वनात राहणारे २९.धातुचा बारीक तंतु ३१.नि:स्वार्थ देणगी ३५.मज्जाव ३६.माधवाची सखी ३७.नागराज मंजुळे यांचा एक सिनेमा ३८.केसांना लावावयाचा रंग ३९.लायसन्स ४०.लहान ४१.नशा आणणारे ४२.आळ ४४.धनी ४५.पुन्हा ४९.जोम ५२.झाडाचे मूळ

**शब्दकोडे क्रमांक.१८८१ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | मा | न | | अ | धो | ग | ती | | वि | न | य |
| स | न | | ख | | र | ज | | मु | का | | व |
| र | | सु | ग | र | ण | | वि | | स | र | |
| भो | ग | वा | | म | | म | धा | ळ | | त | डा |
| ळा | | न | ग | | क | | न | | खु | ला | |
| | नी | | ज | ब | ळी | क | | स | | म | ती |
| आ | | पा | र | ध | | ला | गे | बं | ध | | ट |
| धा | क | टा | | स्तं | भ | | र | ध | | वा | |
| र | स | | न | भ | | थ | वा | | सु | रे | ख |
| स्तं | | घा | व | | चु | रा | | मी | | मा | रा |
| भ | ला | | ल | ढा | | र | स्ता | | को | प | |
| | ल | हू | | स | प | क | | ता | ट | | रे |

प्रकाश में ता.१८ को
दिलवाले




अजय देवगन रविना सुनिल शेट्टी परेश रावल रामी रेड्डी

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE
ता.15 से 4 SHOWS




बिग सिनेमास मनोहर नाट्य चित्रमंदिर: आग्रा रोड धुळे
YODHA (U/A) 12:15,3:15,6:15 & 9:15 pm

| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
|---|---|---|---|---|
| Ticket Rate | ₹150 | ₹112 | ₹100 | ₹100 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
8007232021 232021/233421
BookMyShow Paytm

BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI
2K CHRISTIE DOLBY DIGITAL




ता १६से रोज १ खेल टा. १२ बजे
बस्तर
| तिकीट | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| दर | ८० रु. | ८० रु. | १३० रु |

ONLINE TICKET BOOKING OPEN
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

## जानकीराम नगरात दीड लाखांची चोरी

धुळे, दि.१७- जुने धुळे जानकीराम नगर बर्फ कारख्यान्या जवळील जैन बॅग सेंटर येथील घरातून अज्ञात व्यक्तीने घराच्या मागील बाजून प्रवेश करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा दीड लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रफुल्ल नवनीतलाल जैन यांनी दि.१६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, अज्ञात व्यक्तीने राहत्या घराच्या मागील लाकडी दरवाजाचा कडी कोंडा तोडून दि.१५ फेब्रुवारी २०२३ ते १६ मार्च २०२३ या कालावधीत घरात प्रवेश केला. घरातील बेडरूम मधील कपाटातील दीड लाखांचा मुद्देमाल चोरून नेला.

## खरेदीत प्रलोभनांना बळी पडल्यास फसगतीची शक्यता, दाद मागा- प्रा.डागा

**शिंदखेडा, दि.१७- प्रलोभनांना बळी न पडता वस्तूंची व सेवांची खरेदी करा, खरेदीची पावती घ्या असे आवाहन ग्राहक पंचायत महाराष्ट्र धुळे जिल्हा संघटक व ग्राहक संरक्षण परिषदेचे असाशकीय सदस्य प्रा. चंद्रकांत डागा यांनी केले. ते तहसील कार्यालय व एम.एच.एस.एस.हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक ग्राहक दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**



तहसिल कार्यालयात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसिलदार बन्सीलाल वाडीले तर एमएचएसएस मध्ये प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण पाटील होते. ग्राहक पंचायतीचे अधिष्ठान स्वामी विवेकानंद व ग्राहक तीर्थ स्व. बिंदूमाधव जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

प्रा. डागा म्हणाले, विक्रेता जेव्हा जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने वस्तूत भेसळ करतो, हलक्या प्रतीची वस्तू व सेवा देतो, कमी वजनाची वस्तू देतो, एकावर एक फ्री किंवा हे घेतले तर ते फ्री, शून्य टक्के व्याजदर, भव्य सुट, जुन्या वस्तू देऊन नव्या घ्या, सेल अशा प्रलोभनांच्या योजना आणतो तेव्हा ग्राहक नाडला जातो. अशावेळी ग्राहक न्यायालयात दाद मागता येते.

नविन ग्राहक संरक्षण कायदा २०१९ हा ग्राहकांना अधिक हितकारी आहे. या कायद्यात उत्पादनाचे उत्तरदायित्व उत्पादक, वितरक तसेच जाहिरात करण्यापूर्वी उत्पादन बाबत दाव्यांची खातरजमा करण्याची जबाबदारी सेलिब्रिटींची असेल. केंद्रिय ग्राहक संरक्षण प्राधिकरणची स्थापना, मध्यस्थ सेल स्थापन, ऑनलाईन तक्रार नोंदवणे व कामकाज चालविण्याची सुविधा, ऑनलाईन, टेली-शॉपिंग कंपन्यांचा समावेश, ग्राहक संरक्षण परिषद, तज्ञ व्यक्ती किंवा संघटनेचे मत घेणे आयोगास नवीन कायद्यानुसार शक्य झाले आहे. ग्राहकांची फसगत झाल्यास अवश्य दाद मागण्याचे प्रा.डागा यांनी सांगीतले. नायब तहसिलदार बन्सीलाल वाडीले यांनी प्रत्येक व्यक्ती ग्राहक असतो. खरेदी करतांना ती पावती घेऊनच करावी, ओषधे खरेदी करतांना वापरावयाची अंतिम तारीख पाहून व पक्के बिल घेऊनच खरेदी करण्याचे आवाहन केले. तहसिलच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक छाया पवार तर एमएचएसएसमधे आर.पी.चौधरी यांनी केले. सुत्र संचालन नलिनी वेताळे, प्रा. संदीप गिरासे तर आभार प्रदर्शन शारदा बागले, प्रा.भैय्या मंगळे यांनी केले. एमएचएसएसच्या कार्यक्रमास सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते तर तहसिलला ग्राहक संरक्षण परिषदचे अशासकीय सदस्य सूरज देसले, जितेंद्र मेखे, रेशन दुकानदार संघटनेच्या सुनीता भामरे, सविता परदेशी, पुरवठा विभागाच्या कार्तिकी मराठे, आशा कोळी, एस.एस. बिऱ्हाडे, सुनिल कणके, एम.एम. पवार, पूजा सनेर, प्रीती शाह आदी उपस्थीत होते.


Shri. Achalgachhadhipati Shrimadjinendrasagarsurishwarji,
Shri. Cutchi Dasa Oswal Jain Vidhyarthi Gruha's,

SHREEJI ENGLISH MEDIUM SCHOOL,DHULE.

80 FEET ROAD,OPP LOKMANYA HOSPITAL,DHULE

ADMISSION OPEN 2024-25

PLAY GROUP TO STD. X

Admission Form Available

Office Timing :- 9:00 am to 1:00 pm

25% Concession in school Fess For Jain Community Students

FEATURES...
*Quality Education | Student Centric Learning.
*Well Qualified Staff
*Higher Classrooms Equipped With Tata Edge Software, Computer Lab, Science Lab, Library, CCTV Camera.
*Spacious Sports Ground With Sports Facilities.
*Diverse Activities Year-Round Fostering Holistic Student Development .


---

अॅड.बी.व्ही.सोनवणे, शिंदखेडा,
अॅड.शिरीषकुमार बी.सोनवणे, शिंदखेडा

**जाहीर समन्स/नोटीस** नि.६

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब वर्ग १ यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.५९/२०२४

१) जनाबाई संभाजी पवार, २) रविंद्र संभाजी पवार,
३) विजय संभाजी पवार, ४) सुरेखा बापुराव साळुंखे,
५) ललिता भिका भदाणे, ६) विजया नवल पाटील ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कुणीही नाही ..... **जाबदेणार**

संभाजी उर्फ संभु महादु पवार (मयत) = (मृत्यू दि.२३/०८/२०२१.)
मृत्यू स्थळ विटाई, ता.शिंदखेडा, जि.धुळे.

तमाम लोकांना जाहीर समन्स/नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ जनाबाई संभाजी पवार, वै. रा. विटाई, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांनी या न्यायालयात अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील संभाजी उर्फ संभु महादु पवार हे दि.२३/०८/२०२१ रोजी विटाई, ता.शिंदखेडा, जि.धुळे येथे मयत झाले आहेत. त्यांना अर्जदार हे अर्जात नमूद केल्या प्रमाणे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला मिळण्यासाठी त्यांनी दिवाणी किरकोळ अर्ज नं.५९/२०२४ चा दाखल केलेला आहे.

वरील अर्जाच्या कामी कुणाची हरकत तक्रार अगर वारसाबाबत आपला हितसंबंध असल्यास शिंदखेडा न्यायलयात पुढील दिनांक१६/४/२०२४ रोजी आपली हरकत अगर म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वता अगर आपल्या मार्फत वकील लावून हजर राहावे. कुणाचीही तक्रार हरकत न आल्यास अर्जाचे चौकशीचे काम नियमानुसार चालविण्यात येयील.

सदरची नोटीस आमच्या सही निशी व मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक १५/३/२०२४ रोजी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिंदखेडा — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिंदखेडा

---

**जाहीर नोटीस**

**शिंदखेडा येथील म.तहसिलदार सो. यांचे न्यायालय**

फौ.क्र.अर्ज नं.

श्री.इंद्रसिंग खुमानसिंग गिरासे, उ.व.६६, धंदा- इतर
रा.मौजे बामखेडा पो बिलाडी,
ता.शहादा, जि.नंदुरबार ..... **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रामसेवक तथा निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम पंचायत कार्यालय आरावे,
ता.शिंदखेडा, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वडील कै.श्री.खुमानसिंग सकतसिंग गिरासे यांचे मृत्यू मौजे आरावे, ता.शिंदखेडा जि.धुळे येथे दि.०१/०६/१९५६ रोजी झाला असल्याने अर्जदार यांनी दि.०१/१२/२०२३ रोजी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(२)(३) प्रमाणे नोंद होणे बाबत आदेश मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, श्री.इंद्रसिंग खुमानसिंग गिरासे यांच्या अर्जास जन्म/मृत्यू नोंद प्रकरणी कोणाची काही हरकत तक्रार असल्यास त्यांनी वर्तमानपत्रातील प्रकटन प्रसिध्दी दिल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत म.न्यायालयात स्वत: अगर वकिलाप्रतिनिधी मार्फत उपस्थित होवून लेखी तक्रार सादर करावे. तसे मुदतीत कोणाची तक्रार न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यास जन्म/मृत्यू नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक-१७/०३/२०२४**

